प्रेसनोट

जा.क्र. 362/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :– १६/०७/२०१८

" आईचाच खुन करणाऱ्या आरोपी मुलास आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे गोबरवाही अंतर्गत सिंडीकेट कॅम्प, बाजार टोला, डोंगरी बु. येथिल ईसम नामे दुष्यंत उर्फ गब्बर गुलाब पुष्पतोडे, वय २६ वर्ष याने सावत्र आईचा खुन केल्याचा आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक १६.०७.२०१८ रोजी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा. यांनी सदर आरोपीस आजन्म सश्रम कारावास व ५०००/– रूपये द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, डोंगरी बु. येथिल पोलीस पाटील सौ. निलीमा शेंदरे यांचे पती तक्रारदार श्री. प्रदिप शिवाजी शेंदरे हे दिनांक २९.०४.२०१६ रोजी रा. दरम्यान आपले घरी कुटूंबासह हजर असतांना रात्री ११.०० वा सुमारास सिंडीकेट कॅम्प येथिल दुष्यंत गुलाब पुष्पतोडे हा तक्रारदार यांचे घरी आला व पैशाचे देवानघेवानीचे कारणावरून मी आपले सावत्र आईस कुऱ्हाडीने मारून खुन केला आहे, मला पोलीसांचे स्वाधीन होणे आहे असे येवुन सांगीतले वरून तक्रारदार यांनी घटणेची गाभिर्याने दक्षता घेवनु दुष्यंत पुष्पतोडे यास आपले घरी ठेवुन त्याचे घरी जावुन घटणेची चौकशी केली असता त्याची सावत्र आई फुलन गुलाब पुष्पतोडे हि घराचे दारासमोर रक्त बंबाळ अवस्थेत पडलेली दिसली तिचे मानेवर, डोक्यावर माराच्या जख्मा दिसल्याने घटणेची खात्री करून पोलीस ठाणे गोबरवाही येथिल तत्कालीन ठाणेदार मनोज वाढीवे यांना त्वरीत घटणेची माहिती फोन द्वारे देवुन दुष्यंत गुलाब पुष्पतोडे यास आपले ताब्यात ठेवले. ठाणेदार श्री. वाढीवे साहेब यांनी तात्काळ पोलीस स्टॉपसह घटणास्थळी येवुन कार्यवाही केली. अशी तोंडी तक्रार श्री. प्रदिप शिवाजी शेंदरे यांनी दिल्याने पो.स्टे. गोबरवाही येथे अपराध क्र. १६/१६ कलम ३०२ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन ठाणेदार तथा सहा. पोलीस निरीक्षक मनोज वाढीवे सुरू करून दुष्यंत उर्फ गब्बर गुलाब पुष्पतोडे, वय २६ वर्ष यास गुन्हात अटक करून साक्षपुरावा

गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने कलम ३०२,२०१ भादवि अन्वये दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३७/१६ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. आर. पी. पांडे सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. प्रमोद भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक १६.०७.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन दुष्यंत उर्फ गब्बर गुलाब पुष्पतोडे, वय २६ वर्ष याचे विरूध्द आरोप सिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवि** अन्वये **आजन्म सश्रम कारावास व ५०००/– रूपये दंड, दंड न भरल्यास ६ महिणे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.** सदर गुन्हयात सहा. पोलीस निरीक्षक, किशोर झोटींग, म्हसकर ठाणेदार पोलीस ठाणे गोबरवाही यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, शाम निखाडे/४१३ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**'महाराष्ट्र पोलीस दल, जिल्हा भंडारा तसेच सरकारी अभियोक्ता वर्ग जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा तर्फे जनतेस निर्भीड पणे गुन्हयाचे दोषसिध्दी करीता व महिलांवरील अत्याचार रोखण्याकरीता पोलीसांना पंच व साक्षदार म्हणुन सहकार्य करण्याचे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.'**

**टिप** :– सदर प्रकरण सामाजिक दृष्टया महत्वाची असल्याने वृत्तपत्राचे मुख्य व दर्शनी भागावर प्रसारीत करण्याची विनंती

(एम.एच.कोरेटी)
पोलीस निरीक्षक,
जिल्हा विशेष शाखा,
दुरध्वनी क्र.०९५२२५३८६७२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.